# तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी औरंगाबाद

Email-tahsildarabad@gmail. Phone no.02402334728

**अतितात्काळ-कोरोना कोविड १९ प्राधान्य**

जा.क्र.२०२०/नै.आपत्ती/ कोव्हीड-१९/कावि-
दिनांक १०/०६/२०२०

वाचा:- १. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ खंड २, ३ व ४.
२. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५.
३. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांची दिनांक १३ मार्च २०२० ची अधिसूचना.
४. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दिनांक १४ मार्च २०२०.
५. उप सचिव, महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे पत्र क्र. संकिर्ण २०२०/प्र.क्र.१०१ एसडी.४ दिनांक १४ मार्च २०२०
६. प्रधान महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दिनांक १६ मार्च २०२०
७. सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील अधिसूचना क्र. करोना २०२०/ प्र.क्र.५८/आरोग्य-५ दिनांक १४ मार्च २०२०.
८. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे सुधारीत परिपत्रक क्र. DMU/२०२०/CR९२/DisM-१, Dated २५ March २०२०. व ३१/०५/२०२०
९. मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे कडील फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये मनाई आदेश जा.क्र.२०२०/गृहशाखा/दंडवि-१/कावि- दिनांक ०३/०५/२०२०, १९/०५/२०२० व ३१/०५/२०२०

**::आदेश::**

ज्याअर्थी, जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना (कोव्हीड-१९) या विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषीत केलेला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात, महाराष्ट्रातील शहरात गतीने पसरत आहे असे दिसून येत आहे. तसेच राज्य शासनाने कोरोना विषाणुचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन, सदर कायद्यातील खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमीत केलेली आहे.

त्याअर्थी, मी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, औरंगाबाद मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन कोव्हिड केअर सेंन्टर (Covid Care Center) करिता खालील खाजगी शिवा ट्रस्ट ग्रुप ऑफ इंन्सटयुशन औरंगाबाद यंशवतराव चव्हाण अयुवेद मेडिकल कॉलेज व हॉस्पीटल मौजे निपाणी ता. जि. औरंगाबाद, शासनाच्या पुढील आदेशा पर्यंत सर्व कार्यालयीन कर्मचारी/ सफाई कामगार, इलेक्ट्रीशीयन/ पाणी पुरवठा कर्मचारी / माळी कामगार/ सर्व इमारतीसह परिसर, सर्व फर्निचरसह अधिग्रहन करण्यात येत आहे.

| अ.क्र. | खाजगी हॉस्पीटलचे नाव | शेरा |
|---|---|---|
| १ | शिवा ट्रस्ट ग्रुप ऑफ इंन्सटयुशन औरंगाबाद यंशवतराव चव्हाण अयुवेद मेडिकल कॉलेज व हॉस्पीटल मौजे निपाणी ता. जि. औरंगाबाद. | प्राचार्य डॉ वैजिनाथ यादव संपर्क क्र. ९५२७८३६६६६ |



Scanned by CamScanner

सदरील आदेश व अधिसुचनेची अवहेलना करणारी कोणतीही व्यक्ती संस्था अथवा हॉस्पीटल चे मालक, संघटना ही भारतीय दंडसंहिता (४५ ऑफ १८६०) ६० च्या कलम १८८ तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ बी, ५५, ५६ नुसार दंडनीय कायदेशीर कारवाईस पात्र राहील याची नोंद घ्यावी.

सही/-
**इन्सिडेंट कमांडर तथा**
**तहसिलदार औरंगाबाद**

**प्रतिलिपी:-**

१. मा. जिल्हाधिकारी, कार्यालय औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. पोलीस अधिक्षक (ग्रामीण), औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा. उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
४. तालुका आरोग्य अधिकारी, ता. जि. औरंगाबाद यांना देवून कळविण्यात येते की, सदरील रुग्णालय तात्काळ आपल्या ताब्यात घेवून कोरोना रोगाच्या दृष्टीकोनातून ISOLATION च्या उपाय योजना करण्यात याव्यात.
५. गट विकास अधिकारी, पंचायत समिती औरंगाबाद यांना उचित कार्यवाहीस्तव देवून कळविण्यात येते की, Covid Care Center मध्ये पाण्याची व सदरील Covid Care Center मध्ये निर्जतुकीकरण करण्यासाठी कर्मचा-यांची नियुक्ती करुन या कामी आवश्यक साहित्य व मनुष्यबळ पुरविण्यात यावे.
६. नियंत्रण अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसुल-१) यांना देवून सूचित करण्यात येते की, सदरील Covid Care Center मध्ये आवश्यक साहित्य व सुविधा पुरविण्याबाबत तजविज करावी.
७. सहा. पोलीस निरीक्षक, चिकलठाणा ता. जि. औरंगाबाद यांना देवून कळविण्यात येते की, शिवा ट्रस्ट ग्रुप ऑफ इंन्सटयुशन औरंगाबाद यंशवतराव चव्हाण अयुवेद मेडिकल कॉलेज व हॉस्पीटल मौजे निपाणी ता. जि. औरंगाबाद येथे कोव्हिड केअर सेंन्टर (Covid Care Center) उभारण्यात आले असुन सदरील ठिकाणी तात्काळ योग्य तो पोलीस बंदोबस्त पुरविण्यात यावा..
८. मंडळ अधिकारी, चिकलठाणा/ तलाठी सजा, झाल्टा / भालगांव यांना तात्काळ अनुपालनास्तव.
९. व्यवस्थापक, शिवा ट्रस्ट भालगांव - निपाणी ता. जि. औरंगाबाद यांना अनुपालनास्तव.

**इन्सिडेंट कमांडर तथा**
**तहसिलदार औरंगाबाद**



Scanned by CamScanner